आजचा दिनविशेष
१९४५ : अमेरिकेने जपानच्या नागासाकीवर दुसरा अणुबॉम्ब टाकला..

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ९ ऑगस्ट २०२५ | अंक २३१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




## पिसाळलेला कुत्रा म्हशीला चावला, अन नांदेडमध्ये रेबीजचं इंजेक्शन साठी लोकांनी केली गर्दी?



**पिसाळलेल्या कुत्र्याच्या चाव्यामुळे एका दुभत्या म्हशीचा मृत्यू झाला. या म्हशीचे दूध सुमारे १७१ नागरिकांनी सेवन केल्याने गावात भीतीचे वातावरण**

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात असलेल्या बिल्लाळी गावात एका पिसाळलेल्या कुत्र्याच्या चाव्यामुळे एका दुभत्या म्हशीचा मृत्यू झाला. कुत्रा चावल्यानंतर म्हैस एक महिनाभर जिवंत होती. या म्हशीचे दूध सुमारे 171 नागरिकांनी सेवन केल्याने गावात भीतीचे वातावरण आहे. खबरदारी म्हणून आरोग्य विभागाने तात्काळ या सर्व नागरिकांना अँटी-रेबीजची प्रतिबंधात्मक लस देण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता लसीकरण करून घेण्याचे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आकाश देशमुख यांनी केले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. समोर आलेल्या माहितीनुसार, मुखेड तालुक्यातील बिल्लाळी गावात किशन दशरथ इंगळे यांच्याकडे असणाऱ्या एका म्हशीला पिसाळलेला कुत्रा चावला होता. सुरुवातीचे काही दिवस ही म्हैस सामान्य होती, मात्र काही दिवसांनंतर ती आजारी पडली, मात्र तिला वेळेत उपचार न मिळाल्याने तिचा 5 ऑगस्टला मृत्यू झाला. या म्हशीचे दूध विकले जात होते, त्यामुळे जवळपास 5 गावातील 171 लोकांनी या म्हशीच्या दुधाचे सेवन केल्याचे समोर आले आहे.

### रेबीज आजाराची माहिती

रेबीज हा एक अतिशय घातक आजार आहे. संक्रमित प्राण्याच्या चाव्यामुळे हा आजार होतो. कुत्रे, मांजरे, कोल्हे, वटवाघळ यांच्याकडून रेबीजचा प्रसार मानवात होतो. या आजाराची लागण झाल्यानंतर रेबीज विषाणू मेंदूपर्यंत पोहोचतो आणि मेंदूला दाह होऊन रुग्णाला झटके येणे, Hydrophobia, आक्रमकता वाढणे अशा लक्षणांचा सामना करावा लागतो. अशी लक्षणे दिसू लागल्यावर रुग्णाचा मृत्यू होतो. त्यामुळे तुम्हाला प्राणी चावल्यास, एकदे लक्षणे दिसल्यास त्वरित उपचार घेणे गरजेचे आहे. प्राणी चावल्यानंतर लगेच जखम साबणाने धुवा, रेबीज लस घ्या. तसेच पाळीव कुत्र्यांचे लसीकरण करा मात्र वेळेवर वैद्यकीय मदत घेणे हे या आजारापासून बचाव करण्याचे मार्ग आहेत. या सर्व गोष्टींची योग्य काळजी घेतल्यास रेबीज टाळता येतो, मात्र याकडे दुर्लक्ष झाल्यास तो प्राणघातक ठरू शकतो.

## वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी चर्चेस नकार दिल्याने मेल नर्सेस बचाव समितीचे पदाधिकारी आक्रमक मंत्रालया समोर जोरदार निदर्शने

(प्रतिनिधी मुंबई) शासकीय DMER आधिपरिचारिका पदभरती मध्ये महिला आरक्षण 80 % आणि पुरुष आरक्षण फक्त 20% असा आर. आर. प्रसिद्ध झाल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व नर्सिंग संघटना,खाजगी नर्सिंग संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक,मेल नर्सिंग विद्यार्थी, पालक आणि नर्सिंग ऑफिसर्स, यांच्या मध्ये प्रचंड संतापाची लाट पसरली असून दीड महिन्यांपासून संपूर्ण महाराष्ट्रात विविध पद्धतीने लोकशाही, संविधाननिक, शांततेच्या मार्गाने राज्य शासनाविरुद्ध आंदोलने चालू होते त्याचाच एक भाग म्हणून आझाद मैदान मुंबई येथे 5 ऑगस्ट रोजी एक दिवसीय राज्यव्यापी धरणे आंदोलन पुकारण्यात आले होते.ते चालू असताना अचानक पणे वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री.हसन मुश्रीफ साहेब आंदोलनाला भेट देणार नाहीत अशी कुजबुज आंदोलकांमध्ये पसरली त्यामुळे राज्यातील सर्व मेल नर्सेस ला याची प्रचंड चीड आली व मेल नर्सिंग विद्यार्थी, मेल नर्सेस बचाव समितीचे सर्व राज्य पदाधिकारी यांनी मंत्रालय परिसरात संबंधित मंत्र्यांना भेटण्याची,निवेदन घेण्याची विनंती



केली मात्र कोणीही ऐकण्याच्या स्थितीत नव्हते त्यामुळे मेल नर्सिंग विद्यार्थी ,पदाधिकारी यांनी मंत्रालयासमोरच आपला राग काढायला सुरुवात केली आणि शासनाविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली तेंव्हा काही काळ तिथे प्रचंड गदारोळ उडाला, मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत पुढील अनर्थ टाळला,आंदोलक मेल नर्सिंग विद्यार्थी, पदाधिकारी यांना ताब्यात घेऊन समज देऊन सोडण्यात आले त्यानंतर राज्य शासनाच्या (DMER ) वतीने संचालक डॉ . चंदनवाले साहेब यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि बैठकी साठी पत्र देण्यात आले त्यामुळे आंदोलक मेल नर्सिंग विद्यार्थी व मेल नर्सेस बचाव समिती चे पदाधिकारी शांत झाले व आंदोलन तात्पुरते स्थगित केले.



गेवराई: तालुक्यातील हिरापूर परिसरातील विद्यार्थ्यांना कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी या शाळेत जाण्यासाठी बस सेवा सुरू केल्या बद्दल प्राचार्य अण्णासाहेब थिटे आणि बस चालक, वाहकाचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी परसराम गुंजाळ, लक्ष्मण जाधव, दत्तात्रय मुंजाळ, उत्तरेश्वर कायस्थ,ओमकार प्रभाळे, अमजद पठाण, राजेंद्र वाघमारे, संतोष गुंजाळ, अमोल धुतावळे यांच्यासह शिक्षक राजेश पंडित, शिवाजी धट,विनायक खाडप,सतीश बहीर आदि.

## शहाजनपुर (चकला) येथे वै. ह.भ.प तुकाराम महाराज रुपनर अखंड हरिनाम सप्ताहास बुधवारी सुरवात

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी गेवराई तालुक्यातील शहाजनपुर (चकला) येथे मंदिरामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ दिनांक 13/8/2025 पासून सुरू होत आहे. सुंदर आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्त सात दिवसात नामावंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे. दि.20/8/2025 बुधवार रोजी ह. भ.प. सुरेशानंद महाराज शास्त्री यांचे 10 ते 12 काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद





होईल. तरी गावकरी, भजनी मंडळ, पंचक्रोशीतील सर्व वारकरी संप्रदाय सर्व भाविक भक्तांनी कीर्तन श्रावणाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा असा आव्हान आयोजक समस्त भजनी मंडळी व गावकरी मंडळी शहाजनपूरच्या (च ) वतीने करण्यात येत आहे. स्थळ :हनुमान मंदिर शहाजनपुर (चकला)या ठिकाणी होणार आहे, तरी पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी उपस्थित राहावे असे आव्हान ग्रामस्थांनी केले

## बाबरी मुंडे हा आमच्या पक्षात नवीन पाहुणा आहे, कार्यकर्त्यांनी त्यांना सांभाळून घ्या, आमदार प्रकाश सोळंके

**वडवणी भागामध्ये बाबरी मुंडे ला बाबरी सेट असे म्हणतात ,अजित दादा पवार यांचे वक्तव्य**

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली वडवणी नगरीचे माजी नगराध्यक्ष बाबरी मुंडे व राजाभाऊ मुंडे यांच्यासमवेत असंख्य सरपंच नगरसेवक कार्यकर्ते यांनी पक्षांमध्ये प्रवेश केला, सदरील पक्षप्रवेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला, या पक्षप्रवेश सोहळ्यास जिल्ह्यातील अजित दादा पवार गटाचे



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तालुका अध्यक्ष विविध पक्षाचे विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी आपल्या भाषणात अजित पवार



म्हणाले आहेत की वडवणी येथील बाबरी मुंडे यांना या भागामध्ये बाबरी शेठ असे म्हणतात असे वक्तव्य राज्याचे उपमुख्य मंत्री अजित पवार यांनी भाषणामध्ये केले यावेळी आमच्या पक्षांमध्ये बाबरी मुंडे यांचे स्वागत, माजलगाव चे विद्यमान आमदार प्रकाश सोळुंके म्हणाले आहेत की बाबरी हा आमच्या पक्षात नवीन पाहुणा आहे कार्यकर्त्यांनी त्यांना सांभाळून घ्यावे असे वक्तव्य प्रकाश सोळंके यांनी केले, सदरील पक्षप्रवेश सोहळ्यास माजलगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मृदगंध साहित्य संमेलनात ग्रामीण शिक्षणावर परिसंवाद

येत्या २३ व २४ ऑगस्ट रोजी भावठाणा येथे होणाऱ्या मृदगंध साहित्य संमेलनात ग्रामीण शिक्षण या महत्वाच्या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील शिक्षण व्यस्थेचे आजचे स्वरूप काय आहे? त्याचे ग्रामीण विद्यार्थ्यावर काय परिणाम होतात? ग्रामीण शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी काय करावे लागेल? आशा महत्वपूर्ण विषयावर परिसंवादात विचार केला जाईल. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त मुख्याधतापक भारत सातपुते असून ममदापूर येथील बडगिरे विद्यालयातील शिक्षक प्रीतम पन्हाळे व सायगावच्या जि. प. शाळेतील शिक्षिका राणा अफरीन हे दोघे आपले विचार मांडणार आहेत. शिक्षण क्षेत्रातील सर्व स्तरावरील अधिकारी आणि कर्मचारी, शिक्षक आणि पालकांनी हा परिसंवाद ऐकायला हवा. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनाचे अध्यक्षस्थान ग्रामीण साहित्यिक उमेश मोहिते हे भूषवणार आहेत. मानवलोक चे कार्यवाह अनिकेत लोहिया स्वागताध्यक्ष आहेत. संमेलनाचे उदघाटन बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ नरेंद्र काळे करणार असून या प्रसंगी गावच्या सरपंच रुक्मिणीबाई पारीख ही उपस्थित राहणार आहेत. नॅचरल शुगरचे अध्यक्ष बी बी ठोंबरे समारोप सत्रात मार्गदर्शन करतील. त्यांच्या सोबत मसाप माध्यवर्तीचे कार्यकारिणी सदस्य दगडू लोमटे असणार आहेत

## राज्यातील व्यवसाय कर रद्द करा जिल्हा व्यापारी महासंघाची अजित पवारांकडे मागणी; महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा

बीड : प्रतिनिधी राज्यातील व्यापाऱ्यांकडून घेतला जाणारा व्यवसाय कर रद्द करावा तसेच विज वितरण कंपनीकडून सोलारबाबत बदल करण्यात आलेले नियम रद्द करावेत यासंबंधीच्या मागण्या व्यापाऱ्यांच्या वतीने पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आल्या. याबरोबरच इतर महत्त्वपूर्ण विषयांवर देखील निवेदन देण्यात आले आहे. पालकमंत्री अजित पवार हे बुधवार व गुरुवार असे दोन दिवस बीड दौऱ्यावर होते. या दरम्यान बीडमधील व्यापारी, उद्योजकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. व्यापाऱ्यांच्या वतीने बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी सोलार निर्मित युनिट वापरा विषयी विज वितरण कंपनीने बदल केलेले नियम रद्द करावे, वीज बिलात लागणारे Demand Charges व Wheeling



Charges रद्द करावे तसेच राज्यभरातील व्यवसायिकांना लावला जाणारा व्यवसाय कर रद्द करावा व बीड मध्ये व्यापारी भवन देण्यात यावे अशी मागणी केली. यावेळी बीडमध्ये अतिरिक्त एमआयडीसीची स्थापना करावी, एमआयडीसीसाठी माजलगाव बॅक वॉटरचे पाणी उपलब्ध करुन द्यावे, राष्ट्रीय महामार्गापासून एमआयडीसीपर्यंत नवीन रस्ता तयार करावा, एमआयडीसीसाठी वेगळे सबस्टेशन कार्यान्वीत करावे तसेच स्वतंत्र पोलिस चौकी स्थापन करावे याबरोबरच परिसरात झालेले अतिक्रमण हटवावे या मागण्या ऑइल मिल संघटनेचे अध्यक्ष राजीव संचेती यांनी केल्या. यावर पालकमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच माजलगाव येथील मुख्य बाजारपेठेच्या रस्त्याचा प्रश्न व्यापारी महासंघाचे माजलगाव तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांनी मांडला. यावेळी जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, शहराध्यक्ष प्रकाश कानगावकर, वाय जनार्धन राव, जवाहरलाल कांकरिया, शांतीलाल पटेल, लईक अहमद, सुर्यकांत महाजन, सुदाम चव्हाण, तुकाराम साळुंके यांच्यासह उद्योजकांच्या शिष्टमंडळात ऑईल मिल असोसिएशनचे अध्यक्ष राजीव संचेती, जिनींग असोसिएशनचे अध्यक्ष अमृत सारडा, बी.बी.जाधव, गोपाल कासट, माधव निर्मळ यांची उपस्थिती होती.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ९ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

# उत्तरकाशीला ढगफुटी

ढगफुटीपासून महापुरापर्यंत आणि हिमस्खलनापासून भूकंपापर्यंत अनेक आपत्ती तिथे अधून मधून येत असतात. त्या नैसर्गिक असल्या, तरी निसर्गातील वाढत्या मानवी हस्तक्षेपामुळे, विकासाच्या कथित संकल्पनांतून साकारलेल्या प्रारूपामुळे आणि वेड्यावाकड्या बांधकामांमुळे त्या मानवी आपत्तीही ठरतात. अशा प्रकारच्या संकटांचे सूचन निसर्ग वेगवेगळ्या प्रकारे करीत असतो; परंतु त्यांकडे दुर्लक्ष करण्याची वृत्तीही विकसित झाली आहे. त्याची किंमत संकटांच्या वेळी चुकवावी लागते. उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे सध्या आलेल्या आपत्तीत अशीच किंमत चुकवावी लागत आहे. तेथील धराली गावाच्या परिसरात ढगफुटी झाल्याचे सांगितले जात असून, त्यात आतापर्यंत पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर शंभराहून अधिक बेपत्ता आहेत. धराली गावाचा निम्मा भाग चिखलात गेला असून, अनेक घरे आणि इमारती वाहून गेल्या आहेत. मदत आणि बचावकार्य सुरू असले, तरी पावसामुळे त्यात अडथळा येत असल्याचे दिसते. ही दुर्घटना ढगफुटीमुळे झाली की हिमस्खलनामुळे असा प्रश्न आता उपस्थित होत आहे; कारण दुर्घटना घडली त्यावेळी जेमतेम ६.५ मिलिमीटर पाऊस झाल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे. या काळात संपूर्ण उत्तरकाशी जिल्ह्यातील सर्वाधिक पाऊस २७ मिलिमीटर होता. इतक्या कमी पावसामुळे महापूर येण्याची शक्यता नसल्याकडे शास्त्रज्ञ अंगुलिनिर्देश करीत आहेत. शंभर चौरस किलोमीटर क्षेत्रफळात एका तासात शंभर मिलिमीटरहून अधिक पाऊस झाला, तर ढगफुटी झाली, असे मानले जाते. ही ढगफुटीची शास्त्रीय व्याख्या असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे धराली दुर्घटना ढगफुटीमुळे नव्हे, तर हिमस्खनामुळे घडली असण्याची शक्यता वर्तविली जाते. त्यामुळे ही शक्यताही तपासून पाहायला हवी. उत्तराखंड हे उंचावरील ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून ८०० ते ६९०० मीटर उंचीवरील या राज्यात मोठ्या संख्येने हिमनद्या आहेत. एका पाहणीनुसार तिथे बाराशेहून अधिक हिमनद्या असून, त्यांपैकी काही धोकादायक आहेत. या हिमनद्यांमुळे उत्तरेकडील नद्यांना बारमाही पाणीपुरवठा होत असला, तरी पावसाळ्यात त्यांच्यामुळे धोकाही संभवतो. मोठा पाऊस झाला की तो हिमतलावांत साठून राहतो. मात्र, पाण्याची आवक वाढत राहिल्यास तलाव फुटून महापुराची स्थिती निर्माण होते. धराली गावातील सध्याची दुर्घटना याचमुळे झाली असावी, असा तज्ज्ञांचा कयास आहे. विद्यमान दुर्घटनेमागे ढगफुटीचे किंवा हिमस्खलनाचे कारण असले, तरी ते नेमकेपणाने जाणून घेणे आवश्यक आहे. अशा दुर्घटना टाळता येत नसल्या, तरी त्यांची शक्यता कमी करण्याचा प्रयत्न करता येतो. शिवाय, त्यामुळे कमीत कमी जीवितहानी होईल, या पद्धतीने नियोजन करता येते. किनारपट्टीच्या प्रदेशात चक्रीवादळामुळे होणारी जीवितहानी अशा प्रयत्नांद्वारे कमी करण्यात यश येत आहे. उत्तराखंडसारख्या उंचावरील ठिकाणीही हे प्रयत्न अधिक जोरकसपणे होण्याची आवश्यकता आहे. राष्ट्र ीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने, उत्तराखंडमधील धोकादायक हिमनद्यांची यादी तयार केली आहे. त्यानुसार तिथे तेरा हिमनद्या धोकादायक असून, त्यांपैकी पाच अतिधोकादायक प्रकारात मोडणाऱ्या आहेत. पावसाळ्यात त्यांमुळे दुर्घटना झाल्यास जीवितहानी कमी करण्यासाठी उपाय करणे आवश्यक आहे. त्यासाठी हवामान खाते, आपत्ती निवारण कक्ष आणि राज्य व केंद्र सरकारे यांच्यात उत्तम समन्वय हवा. नेमका पाऊस, त्यामुळे हिमस्खलनाची किंवा ढगफुटीची शक्यता याचा अचूक अंदाज हवा. तसे झाल्यास संभाव्य हिमस्खलनाचा धोका ओळखून संबंधित गावांमधील लोकांचे तात्पुरते स्थलांतर करता येते का याचा विचार होऊ शकतो. यामुळे हानी कमी होऊ शकते. हिमालयीन पर्वतरांगा असो की पश्चिम घाटातील डोंगररांगा, सागरकिनारे असो की नद्या, या सर्व ठिकाणी मानवी हस्तक्षेप वाढला आहे, यात शंकाच नाही. भौतिक विकासाच्या साचेबद्ध कल्पनेमुळे खाणकाम, उपसा, जंगलतोड आणि बांधकाम या सर्व गोष्टींमुळे निसर्गातील समतोल ढासळत असल्याकडे शास्त्रज्ञ सातत्याने लक्ष वेधत आहेत. मात्र, त्यांचे इशारे अरण्यरुदन ठरत आहेत. सर्वच यंत्रणा त्याकडे सोयीने दुर्लक्ष करीत आहेत.

# एकीकडे स्मशानभूमी अभावी उघड्यावर अंत्यसंस्कार तर दुसरीकडे 8 वर्षापूर्वी बांधलेल्या स्मशानभूमीत एकही अंत्यविधी नाही

## जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार ; पैसा जनतेचा फायदा गुत्तेदाराचा ; बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील प्रकार :- डॉ.गणेश ढवळे



बीड:- ( दि.०८ ) बीड जिल्ह्यातील १३९४ गावांपैकी तब्बल ६५६ गावांमध्ये अजुनही स्मशानभूमीच अस्तित्वात नाही तर काही ठिकाणी बांधलेल्या स्मशानभूमीची अंत्यंत दुरावस्था असुन बांधकाम ढासळलेल्या स्थितीत तर वादळी वाऱ्यासह पावसात पत्रे उडून गेल्याने निवारा नाही त्यामुळे पावसाळ्यात अंत्यविधी करण्यासाठी अडचण निर्माण होते. मृतदेहाची विटंबना होते. काही गावांमध्ये अंत्यविधी रोखल्याने मृतदेह शासकीय कार्यालयासमोर आणुन ठेवल्याच्या घटनांत वाढ होत आहे. दुसरीकडे मात्र जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार पहावयास मिळत असुन बीड तालुक्यातील महाजनवाडी येथे ८ वर्षापुर्वी ६ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीत अद्याप एकही अंत्यसंस्कार विधी झाला नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वापरात नसलेली स्मशानभूमी जिल्हा प्रशासनाने केवळ गुत्तेदार पोसण्यासाठीच बांधली का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी विचारला आहे.

**गावापासून अडीच किलोमीटर गायरानात स्मशानभूमी बांधल्याने वापरात नाही :- विश्वंभर गिरी ( सरपंच महाजनवाडी)**

बीड तालुक्यातील महाजनवाडी गावची लोकसंख्या २२०० च्या आसपास असुन पुर्वी गावात चिंचेच्या झाडाखाली असलेल्या स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण होऊन घरे,गायगोठे बांधण्यात आले आहेत. त्याठिकाणी स्मशानभूमीची जागा शिल्लक नसल्याने तत्कालीन गावपुढा-यांनी गावापासून अडीच किलोमीटर दुर असलेल्या गायरान जमिनीत स्मशानभूमीचे बांधकाम केलेले आहे. बहुतांश शेतकरी आपल्या शेतात अंत्यविधी करतात तर भुमिहीन असणारे गावालगत नदीच्या ओढ्यात अंत्यविधी करतात. अडीच किलोमीटर गावाच्या बाहेर अंत्यविधीसाठी कोणीही याठिकाणी येत नाही. स्मशानभूमीत ठेवण्यात आलेली लोखंडी जाळी सुद्धा नंतर काढुन नेण्यात आली. त्यामुळे हि स्मशानभूमी वापराविना पडुन असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.

**स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण गंभीर प्रश्न असुन जिल्हा प्रशासन स्मशानभूमीच्या जागा सुरक्षित कराव्यात :- डॉ.गणेश ढवळे**

- - - -

स्मशानभूमीच्या जागेवर होणारे अतिक्रमण हा गंभीर प्रश्न आहे.या अतिक्रमणामुळे स्मशानभूमीची जागा ईतर कारणासाठी वापरली जात आहे. त्यामुळे तेथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याच्या मुलभूत हक्कावर गदा येत आहे. स्मशानभूमीच्या जागेवरून समाज आणि स्थानिक प्रशासन मध्ये संघर्ष निर्माण होतो आहे.अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करावी आणि जागांचा ताब घेऊन त्या सुरक्षित कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## सर्व अतिक्रमण धारकांना हक्काचा पिटीआर मिळवून देऊ आ विजयसिंह पंडित

# गेवराईतील अतिक्रमणधारकांना पीटीआरचे वाटप

गेवराई दि.८ (प्रतिनिधी) गेवराई शहरातील अतिक्रमणधारकाचा पी टी आर चा प्रश्न गंभीर होता. अतिक्रमण धारकांना न्याय मिळाला पाहिजे ही सर्वांची भावना होती. शिवछत्र परिवाराने शासन दरबारी पाठपुरावा करून हा प्रश्न सोडवला, हे खरे असले तरी आपण यात श्रेय घेणार नाही. आपल्या सर्वांच्या संघर्षाचे हे फलित आहे. यापुढील काळात उर्वरित अतिक्रमण धारकांनाही हक्काचा अधिकृत पिटीआर उपलब्ध करून देऊ असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले तर विरोधक सध्या आपण करीत असलेल्या कामाचा अपप्रचार करून राजकारण करत आहेत, पंधरा - वीस वर्षे सत्ता असताना ज्यांना शहरातील प्रश्न सोडविता आले नाहीत त्यांना आता बोलण्याचा अधिकार नाही असा टोलाही त्यांनी विरोधकांना नाव न घेता मारला.







गेवराई नगरपालिकेच्या वतीने संजयनगर येथील अतिक्रमण धारकांना पिटीआर चे वाटप, लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेशाचे वाटप आणि नगर परिषदेच्या व्हॉट्सअॅप चॅटबॉट सेवेचा शुभारंभ आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवशारदा मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, सभापती मुजीब पठाण, माजी नगरसेवक महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, शेख खाजा भाई, दीपक आतकरे, एस. अन्सारी, राधेशाम येवले, शांतीलाल पिसाळ, रिपाइंचे किशोर कांडेकर, कडुदास कांबळे, भास्कर काकडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विरोधकांनी नगरपरिषदेचा स्वार्थासाठी वापर केला त्यांच्या काळात अतिक्रमण धारकाचा प्रश्न प्रलंबित ठेवला, अनुकंपाधारकांना नियुक्ती पत्र देण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. प्रत्येक वेळी राजकारण करण्याचा प्रयत्न केला. अतिक्रमीत जागेवर गाळे काढून भाडे खाण्याचे पाप केले आहे. जनतेने मोठ्या विश्वासाने मला विधानसभेत पाठवले. निवडणूक संपली आणि शिवछत्र परिवार जनतेने दिलेल्या आशिर्वादाची उतराई होण्यासाठी कामाला लागला. नगरपालिकेच्या माध्यमातून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. नागरिकांचे प्रश्न सोडविले. अनुकंपाधारकांना नियुक्ती, संजय नगर सह सर्व अतिक्रमणधारकांना हक्काचा पीटीआर वाटप यांसह नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नियोजन केले. विरोधक मात्र त्याचेही श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत. पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की शिवछत्र परिवाराने सर्वांना न्याय देण्याचे काम करत आहे. कुणाबरोबरही शिवछत्र परिवाराने दुजा भाव केला नाही आणि करणारही नाही. आदरणीय अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नागरिकांचे प्रश्न समजावून सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. विरोधक मात्र आमची कॉपी करत आहेत, येणाऱ्या नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये नगरपालिकेला लागलेले हे हुक काढण्याची वेळ आली आहे. शिवछत्र परिवाराची काम करण्याची पद्धत आपण सर्वांनी समजून घेतली पाहिजे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपण काम करत आहोत. जुने नवे कार्यकर्ते यांनी समन्वय राखून एक दिलाने काम करावे. लोक स्वीकारला तयार आहेत, शिवछत्र परिवाराची ताकद तुमच्या पाठीशी आहे, सरकार आपले आहे कसलीही अडचण येणार नाही सगळ्यांना न्याय देण्याच्या बाबतीमध्ये शिवछत्र परिवार कधीही मागे राहणार नाही असे सांगून परिषदेमध्ये मदत कक्ष सुरू करण्यात आला असून त्याचा नागरिकांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.यावेळी प्रकाश नरनाळे, सुमनबाई धनवटे, कचराबाई हातागळे, रमेश नन्नवरे, सलमान सय्यद, राजेंद्र सोळुंके, बप्पा आबू उपळकर , खय्युम गुलाब रसूल कुरेशी, शेख अफसर हुसेनी, जनाबाई कांबळे सायरा कालू पठाण यांना प्रातिनिधिक स्वरूपात पिटीआरचे वाटप करण्यात आले तरयावेळी लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सलिम बेग, सिद्धांत सोनवणे, नितेश भोसले, संतोष बेदरे, परमेश्वर सुतार, सिद्धात राजोरे, प्रेम सुतार, विकास औटी,अंकुश ससाणे ऋषिकेश डोळस, सखाराम बाजोड, अविनाश कांडेकर, वसंत हातागळे, शंकर उबदे, प्रदीप हातागळे
या वारसांना सफाई कामगार पदावर नियुक्ती पत्र तर अनुकंपा पा भरतीमध्ये शेख शफिक, ज्ञानेश्वर वाघमारे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी प्रास्ताविक केले. कडुदास कांबळे, एस. आर. अन्सारी, महेश दाभाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला गेवराई शहरातील नागरिकासह संजयनगर आणि परिसरातील अतिक्रमणधारक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# मराठा सेवक गजानन बेदरे व राहुल कवठेकर यांच्या माध्यमातून मदत सुपूर्त ! मातृ-पितृ छत्र हरवलेल्या मुलांच्या भविष्याची जबाबदारी घेतली मराठा बांधवांनी!

## दोन्ही मुलांच्या नावे ३ लाख ५० हजारची एफडी ; मराठा बांधवांच कौतुकास्पद कार्य!




पाटोदा | प्रतिनिधी पंधरा दिवसापूर्वी घाटेवाडी येथील वायकर पती-पत्नी अपघातात जागीच मृत्यू पावले त्यांच्या पश्चात दोन मुलं आहेत. त्या मुलांचं मातृ-पितृछत्र हरवल्याने त्यांच्या पुढील शैक्षणिक व जीवन जगण्यासाठी खुला फुलाची पाकळी म्हणून पाटोदा तालुक्यातील मराठा बांधवांनी मदतीचे आव्हान केले होते. त्या आव्हानाला प्रतिसाद देत मराठा बांधवांनी जवळपास 3 लाख 50 हजार रुपये दिले दिले होते ती रक्कम मराठा सेवक गजानन बेदरे व राहुल कवठेकर यांच्या माध्यमातून त्या मुलांच्या नावे एफडी करून दिली आहे.

### मराठे एकवटल्याने अशक्य ती गोष्ट शक्य होते : गजानन बेदरे



मराठा नाव ऐकलं तरी अशक्य ती गोष्ट शक्य होते. पण हे सर्व मराठ्यांनाच माहिती नव्हतं.. ती जनजागृती संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी संपूर्ण मराठा समाजामध्ये जागृत केली आणि आज कोणतीही अशक्य गोष्ट सहजासहजी शक्य होते. त्या मुलांचं मातृ-पितृछत्र हरवलं त्यांना आधार देण्याची जबाबदारी मराठा समाजाची आहे आणि ती खरोखरच सर्व मराठा बांधवांनी खंबीरपणे स्वतःच्या खांद्यावर घेतली आणि त्यांना आज फुल ना फुलाची पाकळी म्हणून ही 3 लाख 50 हजार ची मदत त्यांच्यापर्यंत पोहोच झाली आहे.. हे सर्व मराठे एकवटल्याने शक्य झालं..

**– गजानन बेदरे मराठा सेवक पाटोदा.**

मराठा सेवक गजानन बेदरे व मराठा सेवक राहुल कवठेकर यांच्या माध्यमातून वायकर कुटुंबातील त्या मुलांच्या पुढील आयुष्य व शिक्षणासाठी फुलला फुलाची पाकळी म्हणून 3 लाख 50 हजार रुपये जमा करून फिक्स एफडी केले आहेत. तसेच पुढे जेव्हा गरज भासेल तेव्हा मराठा बांधव खंबीरपणे पाठीशी उभी राहतील असेही या ठिकाणी सांगण्यात आले आहे. त्या दोन्ही मुलांना आई वडील आजी-आजोबा नसल्याने पूर्ण छत्र हरवला आहे. ते सध्या मामाच्या इथे राहत असून त्यांच्या पुढील आयुष्याच्या वाटचालीसाठी मराठा बांधवांनी ही मदत केली असून

### मराठा बांधवांच्या एकोफ्यातून ही मदत शक्य : राहुल कवठेकर



संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून अखंड मराठा बांधव एका हाताखाली आल्याने एकोपा वाढला आहे. एक दुसऱ्यांना सहकार्य असेल किंवा अन्याय विरुद्ध लढा असेल हा अगदी सोपा झाला आहे. म्हणूनच गरजूवंतांना योग्य तो न्याय देणं सोपं झालं आहे किंवा मदत करणं ही सोपं झाला आहे. आज तीन लाख 50 हजार ची मदत गोळा होणं आणि त्या गरजूंपर्यंत पोहोच होणं ही सोपी गोष्ट नव्हे.. मराठ्यांची ताकत...

**– राहुल कवठेकर**
**मराठा सेवक पाटोदा.**

पुढेही गरज भासल्यास सर्व मराठा बांधव खंबीरपणे उभे राहतील असेही यावेळी सांगण्यात आले आहे. पाटोदा एसबीआय बँकेमध्ये एफडी करून त्यांना आधार देण्याचे काम केले यावेळी मराठा सेवक गजानन बेदरे, राहुल कवठेकर, संभाजी चौरे, दत्ता कोकाटे, गणेश अर्सुळ, शिवाजी ढेरे, हरिश्चंद्र सोंडगे, सचिन पवळ, प्रशांत गाडे, पत्रकार गोकुळ इंगोले,सूर्यकांत (दादासाहेब) पवार, रमेश चौरे, संकेत कदम, गणेश ढेरे, लक्ष्मण पव्हने, यांच्यासह अनेक मराठा बांधव उपस्थित होते..

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ९ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## दि.१३ रोजी ऑगस्ट रोजी श्रीसंत भाऊ -बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे खरमाटे महाराज यांचे भगवान बाबा जन्मोत्सव निमित्त किर्तन......




(प्रतिनिधी) श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष १८वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप आयोजित बहुजनांचे दैवत ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत भगवानबाबा यांचा जन्मोत्सव( जयंती) दि १३ऑगस्ट बुधवार रोजी विविध कार्यक्रमांने साजरा होत आहे.सकाळी मुर्ती अभिषेक,आरती व जन्मोत्सव निमित्ताने लावलेला "भावार्थ रामायण"अरण्य कांड"या ग्रंथाची विधीपूर्वक सांगता होईल.तदनंतर सकाळी ११ते १ यावेळत ह भ प मोहन महाराज खरमाटे यांचे राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जिवन चरित्र पर किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.किर्तना नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ बीड शहरातील व परिसरातील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप यांनी व त्यांच्या सर्व सहकारी भावीकांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे



बीड (प्रतिनिधी) दि.८ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या शिफारशीवरून सोशल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष आनंद पवार यांनी केली. मुंबईत झालेल्या कार्यक्रमात पक्षाचे सरचिटणीस आ.शिवाजीराव गर्जे, लतीफ तांबोळी, बोरगे यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर बीडमध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते मेघराज जगदाळे यांना गुरुवारी (दि.७) नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे उपस्थित होते. दरम्यान, मेघराज जगदाळे हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोशल मीडिया माध्यमातून पक्षाची वैचारिक भूमिका आणि अजितदादा पवार यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीबद्दल मेघराज जगदाळे यांचे जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.



बीड नगरपालिकेच्या नूतन मुख्य अधिकारी पदी शैलेश फडसे साहेब यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना. बहुजन रयत परिषदेचे. जिल्हाध्यक्ष विनोद हातागळे.अशोक जी बेद्रे अमोल जाधव किरण वाघमारे..

## शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख यांचा वाढदिवस अनेक सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला... विशेष करून काल परमेश्वर सातपुते सर यांच्यावर बीड जिल्ह्यासह बीड शहर व पिंपळनेर सर्कल मधील विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून जणू शुभेच्छाचा वर्षाव सुरू होता... शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवजी साहेब ठाकरे यांनी वाटसवद्वारे तर शिवसेनेचे सचिव तथा शिवसेना नेते विनायकजी राऊत साहेब यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्या तर बीड जिल्ह्याचे लाडके खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिल्लीला आसतानाही फोनवरून शुभेच्छा दिल्या, याचप्रमाणे आमदार माजी आमदार माजी मंत्री, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तसेच अनेक विविध पक्षाचे आजी माजी जिल्हाप्रमुख, जिल्हाअध्यक्ष,सामाजिक संघटनाचे पदाधिकारी विवध पक्षाचे तालुकाध्यक्ष, उपजिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख सर्व पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक बंधू भगिनी, त्याचप्रमाणे पत्रकार, डॉक्टर, वकील,शिक्षक, सर्व स्नेही मित्र सहकारी युवा, जेष्ठ शेतकरी कष्टकरी यांच्या सह सर्वजण यांनी वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रेमरूपी शुभेच्छा व आशीर्वाद दिले. समाजासाठी झटणाऱ्या नेतृत्वाचा वाढदिवस



केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता न ठेवता सामाजिक कार्यांनी साजरा करावा, ही प्रेरणा देणारा एक वेगळाच आदर्श शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त घालून दिला. त्यांचा वाढदिवस यंदा पिंपळनेर सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये रक्तदान, शैक्षणिक साहित्य वाटप, सामाजिक उपक्रम आणि जनसंपर्काच्या कार्यक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात आणि सेवाभावी दृष्टिकोनातून साजरा करण्यात आला. या विशेष दिनाचे औचित्य साधून बाभळवाडी येथील श्री जगदंबा पेट्रोलियम परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक जाणीव जोपासली. या शिबिराचे आयोजन स्थानिक त्यांचे सर्व सहकारी व कार्यकर्ते आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने यशस्वी पार पडले. सातपुते सर यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळनेर येथील सनराईज इंग्लिश स्कूल, कन्या शाळा, जिल्हा परिषद शाळा, तसेच बाभळवाडी, बेडूकवाडी, लिंबारूई येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सुमारे ६०० हून अधिक विद्यार्थ्यांना वह्या, पेन, कंपास, शालेय दप्तर व अभ्यासासाठी आवश्यक साहित्य वितरित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून ग्रामस्थ भावूक झाले. "शिक्षण हीच खरी ताकद आहे" या विचाराला अनुसरून, सातपुते सरांनी या वाटपामागची भावना विद्यार्थ्यांच्या प्रगतीत सहभागी होण्याची असल्याचे सांगितले. दिवसभर शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे सर्व सहकाऱ्यांच्या, हितचिंतकांच्या, ज्येष्ठ युवा तरुण, सर्वांच्या शुभेच्छा व विविध सामाजिक उपक्रम पार पडल्यानंतर सायंकाळी बाभळवाडी, सांडरवण, पिंपळनेर, बेडूकवाडी, नाथापुर या गावांमध्ये सातपुते सरांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गावोगाव रांगोळ्या, फुलांची सजावट, तसेच फटाक्यांची आतषबाजी करत वातावरण आनंदमय करण्यात आले. स्थानिक तरुण, वृद्ध नागरिक, शाळकरी मुले, सर्वजण या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. सर्वच गावांमधून सरांना शेकडो नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थिती लावली. या संपूर्ण वाढदिवस सप्ताहाचे नियोजन सातपुते सरांचे निष्ठावान कार्यकर्ते, युवा सहकारी, ग्रामस्थ व स्थानिक शिक्षक वर्ग यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रम कुठेही औपचारिक न ठेवता खऱ्या अर्थाने समाजाभिमुख, लोकसहभागातून घडवलेला उत्सव ठरला. या सर्व ठिकाणी कार्यक्रमास गावातील गावकरी ज्येष्ठ नागरिक व पिंपळनेर सर्कल मधील युवा तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## २९ ऑगस्ट मुंबई आंदोलनाच्या निमित्ताने लिंबागणेश येथे चावडीवरील बैठक संपन्न – डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश (दि. ०८) – संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागण्यांसाठी — मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण, कुणबी–मराठा समानतेची घोषणा, ५८ लाख नोंदींची त्वरित अंमलबजावणी, ओबीसी प्रमाणपत्र देण्याची सुलभ प्रक्रिया, आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे, तसेच कायमस्वरूपी आणि कायदेशीर आरक्षणाची हमी — या मागण्यांसाठी दि. २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या भव्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.



याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने गावोगावी बैठकांचे आयोजन सुरू असून, काल दि. ०७ गुरुवारी रात्री बीड तालुक्यातील लिंबागणेश व सोमनाथवाडी येथे चावडीवरील बैठका पार पडल्या. या बैठकीत बीडहून आलेले मराठा सेवक युवराज मस्के पाटील, संजय वाघुले, नाना पवार, अमोल बागलाने, संजय गोडसे यांनी आंदोलनाची रुपरेषा स्पष्ट करत सर्व मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने मुंबईत उपस्थित राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश ढवळे यांनी केले. बैठकीस गावचे सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अशोकराजे वाणी, अक्षय वाणी, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, दिनेश जाधव, दत्ता झोडगे, महावीर वाणी, लक्ष्मण आबदार, प्रकाश वायभट, अजय घोलप, बंडु बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

## गेवराई तालुक्यातील लोडशेडींग बंद करा नसता शिवसेना स्टाईलने आंदोलन गेवराईत शिवसेनेच्या वतीने महावितरण कार्यालयास निवेदन

गेवराई : प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात सकाळी पाच ते नऊ अशी लोडशेडींग सध्या चालू आहे. यामुळे छोटे, मोठे उद्योग व्यावसायिक , शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच शेतकरी यांना लोडशेडींगचा सामना करावा लागत आहे. तरी गेवराई तालुक्यातील सकाळची लोडशेडींग तात्काळ बंद करा अशी मागणी शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांनी महावितरण कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, गेवराई महावितरण कार्यालयाच्या वतीने सकाळी ५ ते ९ यादरम्यान दररोज लोडशेडिंग



सुरु आहे. तरी ही बाब लक्षात घेता शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अँड. नारायण शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत निवेदनाद्वारे महावितरण कार्यालयाला सकाळची लोडशेडींग तात्काळ बंद करा अशी मागणी केली आहे .तरी लोडशेडींग बंद न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, शहराध्यक्ष मुकेश महाजन ,युवा सेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, व्हीजेएनटी तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, विजय पवार , सोन्या पाटील उपस्थित होते.

## नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतलीबीड जिल्हा संतांची भूमी म्हणुन ओळखली जाते

बीड (प्रतिनिधी) दि.८ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.८) नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली. शहरातील रस्ते, अस्वच्छता, वीजपुरवठा, पाणीटंचाई तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी फडसे यांनी दिले.

निवेदनात म्हटले की, शहरात घंटागाडी वेळेवर पाठवून नाल्यातील व रस्त्यावरील कचरा त्वरित उचलणे, मोठ्या नाल्यांची स्वच्छता करणे, बंद पडलेल्या स्ट्रीटलाईट सुरू करणे, नव्या स्ट्रीटलाईट आणि मिनी हायमास्ट बसवणे, चौकाचौकातील लाईट कार्यान्वित करणे, नवीन पोल बसवून एलईडी लाईट बसवणे, पाणी पुरवठा सुरळीत व वेळेवर करणे, पाईपलाईन लिकेज दुरुस्त करणे तसेच अमृत अटल पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे. तसेच, स्व. यशवंतराव चव्हाण



नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (नागोबागल्ली), बौद्धविहार दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली. पंतप्रधान आवास घरकुल योजना आणि रमाई घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते वाटप करणे, शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, अतिक्रमण हटवणे, प्रमुख रस्त्यांना मंजुरी देणे (स्टेडियमजवळील रस्ता, धानोरा रोड, ब्रह्मकुमारी केंद्र ते उर्वी अपार्टमेंट, तहसील ते निरा हॉस्पिटल मार्ग), प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजवणे आणि दलित वस्ती तसेच इतर नागरी वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविणे यांसारख्या मागण्या निवेदनात नमूद आहेत. शहरातील दैनंदिन जीवनाशी निगडित या सर्व समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शिष्टमंडळाने केली असून, मुख्याधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नवनियुक्त मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार

बीड नगरपरिषदेचे नवनियुक्त मुख्याधिकारी शैलेश फडसे हे नुकतेच रुजू झाले आहेत, त्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ९ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# २९ ऑगस्ट मुंबई आंदोलनाच्या निमित्ताने लिंबागणेश येथे चावडीवरील बैठक संपन्न

लिंबागणेश (दि. ०८) – संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागण्यांसाठी — मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण, कुणबी–मराठा समानतेची घोषणा, ५८ लाख नोंदींची त्वरित अंमलबजावणी, ओबीसी प्रमाणपत्र देण्याची सुलभ प्रक्रिया, आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे, तसेच कायमस्वरूपी आणि कायदेशीर आरक्षणाची हमी — या मागण्यांसाठी दि. २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या भव्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने गावोगावी बैठकांचे आयोजन सुरू असून, काल दि. ०७ गुरुवारी रात्री बीड तालुक्यातील लिंबागणेश व सोमनाथवाडी येथे चावडीवरील बैठका पार पडल्या. या बैठकीत बीडहून आलेले मराठा सेवक युवराज मस्के पाटील, संजय वाघुले, नाना पवार, अमोल बागलाने, संजय गोडसे यांनी आंदोलनाची रुपरेषा स्पष्ट करत सर्व मराठा



बांधवांनी मोठ्या संख्येने मुंबईत उपस्थित राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश ढवळे यांनी केले. बैठकीस गावचे सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अशोकराजे वाणी, अक्षय वाणी, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, दिनेश जाधव, दत्ता झोडगे, महावीर वाणी, लक्ष्मण आबदार, प्रकाश वायभट, अजय घोलप, बंडु बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्री.वामनराव शिंदे सेवानिवृत्त

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : आपली शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ शासकीय सेवा पूर्ण करून जिल्हा परिषद शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेले श्री.वामनराव बापूराव पाटील शिंदे यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दि.३१-जुलै रोजी मांजरम येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा लक्ष्मीबाई मंगनाळे,माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.प्रणिता देवरे चिखलीकर माजी सभापती शिवराज पाटील होटाळकर,विनायकराव शिंदे गटशिक्षणाधिकारी सुरेश पाटील श्री. दगडगावे, राजेश्वर डोमशेर सरपंच रुक्मीनबाई शिंदे पोलीस पाटील जयवंत शिंदे,अशोक



पवळे,दत्ता भोसले उपस्थित होते. सौ.प्रणिता देवरे चिखलीकर शिवराज पाटील होटाळकर गटशिक्षणाधिकारी सुरेश पाटील जिल्हा परिषद हायस्कूल मांजरम येथील मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंदांच्याहस्ते सत्कारमूर्ती मा.वामनराव शिंदे व त्यांच्या सुविद्या पत्नी सौ.अर्चनाबाई शिंदे यांना सन्मानपत्र शाल श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करून निरोप देण्यात आला.श्री. वामनराव शिंदे यांनी आपल्या जन्मागावी २७ वर्षे तर इतरत्र ८ वर्षे अशी एकूण ३५ वर्षे शिक्षक म्हणून सेवा बजावली ३१-जुलै रोजी ३५ वर्षे शासकीय सेवा पूर्ण करून ते सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती बद्दल त्यांच्या पुढील कार्यासाठी मंजुषा निवळीकर,गणेश निवळीकर, दीपिका इंगळे, माधव इंगळे,,सचिन बेंद्रीकर,बालाजी इंगळे यांच्या सह मांजरम ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



कळसंबर येथे हरित बीड अभियानांतर्गत वृक्ष लागवड कळसंबर चे सरपंच राजाराम तांगडे ग्रामपंचायत अधिकारी बालाजी साळुंके माजी सरपंच हनुमान वाघमारे ग्रामपंचायत सदस्य गणेश वाघमारे दगडू दगडू सालुगडे राजेभाऊ धनवे किरण धनवे कुंडेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक अनपट सर शाळेचे सर्व शिक्षक व सर्व विद्यार्थी हजर होते बालाजी करांडे रमेश वाघमारे



बीड जिल्हाचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांची किशन तांगडे यांनी सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा देऊन विविध विषयावर चर्चा केली.

# शाश्वत शेती दिन उत्साहात साजरा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : डॉ एम. एस. स्वामीनाथन यांच्या जयंतीनिमित्त शाश्वत शेती दिन कृषी विज्ञान केंद्र,पोखरणी व महाराष्ट्र शासन कृषी विभाग , आत्मा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र पोखरणी, नांदेड-१ येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

सदरील कार्यक्रमाची सुरुवात भारतीय कृषी अनुसंधान परिषद गीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस. डी. मोरे उपस्थित होते, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री दत्तकुमार कळसाईत व के. व्ही. के पोखरणी चे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.



देविकांत देशमुख,नांदेड कृषि विभागातील अधिकारी, के. व्ही. के चे शास्त्रज्ञ व कर्मचारी वर्ग व नांदेड जिल्ह्यातील 192 शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात बळीराजाच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली,असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमिता क्षत्रिय कृषी विस्तार तज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, पोखरणी यांनी तर प्रास्ताविक डॉ. देविकांत देशमुख ( वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृ. व्ही. के. पोखरणी) यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी शाश्वत शेती दिन का साजरा करावा व शाश्वत शेतीचे महत्व आणि डॉ.एम. एस. स्वामीनाथन याच्या जीवनावर प्रकाश टाकला.

त्यानंतर श्रीदत्त कुमार कळसाईत यांनी शाश्वत शेतीवर भर देऊन पिकांचे उरणारे अवशेष न जाळता त्यांचा खत म्हणून वापर करावा व शेतकरी गटांना वाव द्यावा व शेतकरी कंपनीच्या माध्यमातून शेती करावी असे आव्हान केले.

कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ एस. डी. मोरे यांनी शेतकऱ्यांना शाश्वत शेती व स्वामीनाथन अहवाला बद्दल माहिती दिली.

प्रगतीशील शेतकरी भगवान भाईजी इंगोले कृषी मित्र शेतकरी उत्पादक कंपनी मालेगाव व कृषी सखी शीतल पिंपळपल्ले सीमा वसुरे यांनी नेसर्गिक शेती व निविष्ठा निर्मिती या बद्दल उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. एस. एच. जायभाये यांनी केले व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पीक संरक्षण तज्ञ प्रा. एम. जी. कल्याणकर, पशुवैद्यक तज्ञ एम. एन.अंबोरे, कृ.वि. के.च्या ग्रह विज्ञान तज्ञ सौ ए. एस.पवळे श्री ए.जी भालेराव,श्री आर.आर. इंगोले,श्री. एस.एस. जाधव, श्री आर.टी. वाडीले,श्री डी. आर.कदम, सौ पी. एस. हाडोळतिकर, श्री एस.एस. गायकवाड, श्री एस.आर.कोणापुरे व आर.जी. राऊत यांचे विशेष सहकार्य लाभले.

# महामार्ग, पाणी, वीज, शाळा, अंगणवाडी बाबत संदीप क्षीरसागराच्या मागण्याबाबत दादा पॉझिटिव्ह!

बीड –प्रतिनिधी बीड विधानसभा मतदारसंघातील रस्ते आणि इतर विकास कामांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादा पवार यांच्याकडे मागणी केली असता, ना.अजितदादांनी लगेचच संबंधित अधिकाऱ्यांना समोरासमोरच सूचना देऊन बीड विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठीची सकारात्मकता स्पष्ट केली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार २ दिवस बीडमध्ये आलेले आहेत. या दोन दिवसांत ना.अजितदादांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अनेक प्रश्न आणि बाबींकडे बैठकांच्या माध्यमातून नियोजन सुरू केले आहे. या अनुषंगाने गुरूवारी (दि.७) रोजी झालेल्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील विकासाचे विविध प्रश्न आणि प्रस्ताव बैठकीत ना.अजितदादांसमोर मांडले असता, ना.अजितदादांनी जागेवरच संबंधित अधिकाऱ्यांना प्रस्तावांच्या संदर्भात सकारात्मक सूचना दिल्या. ना.अजितदादांनी पुढील कामांबाबत दर्शवली सकारात्मकता राष्ट्रीय महामार्ग 211 (नवीन क्र.52) महालक्ष्मी चौक ते जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्ता या दोन्ही साईडने सहा (6) लाईन रोडसाठी व दोन्ही साईडने ड्रेनेजसाठी मा.अजित दादांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना दिल्या. शिवशारदा ते अमरधाम स्मशानभुमी पर्यंत भुयारी गटारसाठी मा.दादांनी तत्त्वत: सूचना दिल्या. ग्रामीण भागातील मुख्य रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा खोली, अंगणवाडी बांधकाम, पाणी पुरवठा व्यवस्था,




जनसुविधे अंतर्गत स्मशानभुमी बांधकाम, पशु वैद्यकीय दवाखाने, वन विभागाचा विकास, कोल्हापुरी पद्धतीने बंधरे, सिमेंट नाला बंधारे या व इतर आवश्यक असलेले विकास कामे होणे बाबत आ.क्षीरसागरांनी निवेदनासह मागणी केली असता ना.अजितदादांनी सकारात्मकता दर्शविली. बीड शहरातील जिव्हाळ्याचा असलेला रस्त्यांचा प्रश्नही मार्गी लावण्याची केली मागणी बीड शहरातील अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. शहरातील रहदारीसाठी रस्त्यांच्या अवस्थेमुळे मोठी अडचण होत आहे. बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न हा नागरिकांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा झाला आहे. त्यामुळे ना.अजितदादांकडे शहरातील रस्त्यांचा विकासासंदर्भात प्रस्ताव देऊन आ.क्षीरसागर यांनी बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे. आ.क्षीरसागर यांनी पालवण चौक ते नगर रोड (धानोरा रोड), मदर टेरेसा चौक ते कालिका नगर कमान (अंकुशनगर मुख्य रस्ता), बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र. 7 मध्ये बलभीम चौक ते धोंडीपुरा मार्गे माळीवेस सिमेंट रस्ता करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.8 छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते राजुरी वेस पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.08 मध्ये कारंजा टावर ते पिंगळे गल्ली ते बुंदेलपुरा मस्जिद रोड पर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.08 मध्ये राजुरी वेस ते बलभीम चौक व राजुरी वेस बुंदेलपुरा मार्ग कबाड गल्ली पर्यंत सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.8 मध्ये राजुरीवेस-बुंदेलपुरा-कबाडगल्ली मार्गे माळीवेस सिमेंट रस्ता करणे. या कामांना मंजुरी देण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

## राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ खरवंडी ते राजूरी (न.) रस्त्याच्या भूसंपादनचाही मांडला प्रश्न

बीड मतदारसंघातून राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ गेला आहे. या महामार्गासाठी खरवंडी ते राजूरी नवगण पर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. परंतु संपादनाचा शेतकऱ्यांना मावेजा मिळालेला नाही. विकास कामांसाठी शासनाला जमीन संपादित करूनही मावेजावाचून शेतकरी बांधवांचे अतोनात हाल होत आहेत. याबाबत अनेकवेळा पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने ना.अजितदादांनी हा प्रश्न मार्गी लावून जमीन संपादित झालेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com